SAMSUNG

**सॅमसंगतर्फे गॅलेक्सी टॅब ए 2017चे भारतात उद्घाटन,**

**तुमचा सुयोग्य असा संपूर्ण करमणुकीचा भागीदार**

- गॅलेक्सी टॅब ए 2017मध्ये उत्तम डिस्प्ले, दीर्घकाळ चालणारी बॅटरी आणि सॅमसंगचे प्रमुख बिक्सबाय होम हे वैशिष्ट्य आदींचा समावेश
- मेटॅलिक रुपडे, एलईडी फ्लॅशसह कॅमरा, गेम लाँचर यामुळे गॅलेक्सी टॅब ए 2017 एक मल्टीमीडिया उपकरण बनले आहे

**नवी दिल्ली, भारत - 10 ऑक्टोबर 2017** - सॅमसंग इंडिया या देशातील सर्वात मोठ्या आणि ग्राहकांसाठीच्या सर्वात विश्वासार्ह अशा इलेक्ट्रॉनिक्सच्या ब्रँडने गॅलेक्सी टॅब ए 2017चे आज उद्घाटन केले, हे उपकरण म्हणजे तुमच्यासाठी सुयोग्य असा करमणुकीचा भागीदार आहे. गॅलेक्सी टॅब ए 2017 हे एक संपूर्ण करमणूक देणारे उपकरण असून, यातील व्हायब्रंट 8 इंचाचा डिस्प्ले, दिवसभर बॅटरी चालण्याने मिळणारी उत्तम कामगिरी तुमची वैयक्तिक करमणुकीची गरज पूर्ण करते.

करमणुकीचे माहेरघर असलेल्या गॅलेक्सी टॅब ए 2017मध्ये उत्तम असा 8 इंचाचा 480 नीट ब्राइट डिस्प्ले आहे, यामुळे तुम्ही घराबाहेर अगदी उजेडात असलात, तरीही तुम्हाला स्क्रीनवर व्यवस्थित पाहता येते. याची बॅटरी 5000 एमएएचची अतिशय चांगली आहे, यामुळे तुम्ही 14 तासांपर्यंत सातत्याने मल्टीमीडियाचा वापर करू शकतात. याशिवाय गॅलेक्सी टॅब ए 2017मध्ये प्रमुख बिक्सबाय होम हे वैशिष्ट्यही आहे आणि यामुळे ग्राहकांना हवी असलेली माहिती ताबडतोब मिळू शकते, यासाठी एकमेव अॅप ओपन न करता केवळ स्वाइप करायचे आहे. बिक्सबाय तुमचं दैनंदिन काम जाणून घेतं, यामुळे तुम्हाला जे हवंय ते सातत्याने पुरवलं जातं. तुमच्या अॅपच्या वापराची पद्धत, वेळ आणि ठिकाण जाणून घेऊन, बिक्सबाय तुम्हाला काय हवंय ते बरोबर ओळखतं, आणि तुमच्या उपकरणावर ते तातडीने हजरही करतं.

``सॅमसंगने नेहमीच ग्राहकांचे प्रतिसाद पाहिले आहेत आणि त्यांची उपकरणे आणि सेवा यांची नेमकी गरज ओळखली आहे. गॅलेक्सी टॅब ए 2017 हा उत्तम डिस्प्ले देणारा उत्तम ब्रँड आहे, याची कामगिरी सामर्थ्यशील आहे आणि मल्टीमीडिया अनुभवही सर्वोत्तम आहे. ज्या ग्राहकांना अस्सल आणि उत्तम दर्जाची करमणूक अनुभवायची आहे, त्यांच्यासाठी हे उपकरण तयार करण्यात आले आहे. गॅलेक्सी टॅब एमुळे आम्हाला देशातील बाजारपेठेतील नेतृत्वात बाजी मारण्यासाठी मदत झाली आहे,'' असे **सॅमसंग इंडियाचे मोबाइल व्यवसायाचे संचालक, श्री. विशाल कौल** म्हणाले.

या नवीन टॅबमध्ये किड्स मोड समाविष्ट कऱण्यात आला आहे यामध्ये मुलांना डिजिटल प्लेग्राउंडवर सुरक्षित आणि पूर्णपण नवीन काहीतरी शिकता येईल अशा गोष्टी पुरवण्यात येत आहेत. किड्स मोडमध्ये पालकांना आणि मुलांना तज्ज्ञांनी सुचवलेली लायब्ररी, शैक्षणिक खेळ नवीन संहितेसह दर महिन्याला नव्या नव्या अनुभवात प्राप्त होतील. या सेवेत मुलांना त्यांची आवडती कॅरॅक्टर्स पाहता येतील, खेळ खेळता येतील, शिवाय पालकांचे नियंत्रण असलेले विशेष विषय मुलांना पाहता येतील, या ॲपचा वापर करून मुलांना उपयुक्त अशा माहितीवर लक्ष केंद्रित करता येईल आणि त्याच्या वेळेवरही नियंत्रण ठेवता येईल.

गॅलेक्सी टॅब ए 2017ची सहज अशी पकड आहे, आणि मेटल याचा मेटल ब्लॅक ॲक्सेंचर हा याचा प्रमुख लूक आहे. याचे वजन केवळ 364 ग्रॅम आहे. या उपकरणात सॅमसंग स्टेबलसारखी लोकप्रिय वैशिष्ट्ये आहेत, तसेच यात i) ब्लू लाइट फिल्टरमुळे ब्लू लाइटच्या उत्सर्जनावर नियंत्रण ठेवता येते आणि कुठल्याही त्रासाशिवाय झोप घेता येते. ii) गॅलेक्सी टॅब ए 2017 टीव्हीबरोबर सहज जोडले जाते आणि याद्वारे तुम्ही व्हिडिओ, पिक्चर आणि इतर गोष्टींचा मोठ्या स्क्रीनवर आनंद घेऊ शकता. iii) गॅलेक्सी टॅब ए 2017मध्ये इतर गॅलेक्सी उपकरणे स्वयंचलितपणे फ्लो होतात आणि त्यांच्यात अमर्यादित जोडणी होते. iv) गेम लाँचरमुळे तुम्ही सर्व गेम एकाच सुलभ ठिकाणी पाहू शकता, खेळताना अलर्टचा आवाज बंद करू शकता, बटणं अदृश्य करू शकता, जेणेकरून खेळताना तुमचा गेम अचानक बंद होणार नाही, आणि तुम्हाला अविरतपणे गेम खेळण्याचा आनंद घेता येईल.

क्वालकॉम® प्रोसेसरद्वारे (1.4 गिगाहर्ट्ज क्वाड) प्रायोजित, 2 जीबी रॅम आणि 16 जीबी इंटरनल मेमरी (एक्स्पांडेबल वाया मायक्रोएसडी 256 जीबीपर्यंत), गॅलेक्सी टॅब ए 2017 यासह ॲंड्रॉइड अगदी चौकटीबाहेर चालवले जाते. ही कामगिरी उत्तम आहेत, शिवाय याचा 8 एमपी (एफ1.9) कॅमेरा एलईडी फ्लॅश रेअर कॅमेरा आणि 5एमपी (एफ2.2) फ्रंट कॅमेरासह येतो, यामुळे फोटो अतिशय स्वच्छ, उजळ येतात. अगदी कमी प्रकाश असेल तरीही तुम्हाला यातून उत्तम फोटो काढता येतात, ब्राइट लेन्स आणि नव्याने देण्यात आलेला फ्लॅश यामुळे हे शक्य होते. एचडीआरमोडसह, तुमचे फोटो अतिशय स्टनिंग येतात, याबरोबरच सावल्या आणि ठळक वैशिष्ट्य यांत समतोल राखला जातो.

**किंमत आणि उपलब्धता**

गॅलेक्सी टॅब ए 2017 17,990 रुपयांना सोनेरी आणि काळ्या अशा दोन रंगांत उपलब्ध असेल. 10 ऑक्टोबर 2017 पासून रिटेलच्या सर्व दुकानांत हे उपकरण उपलब्ध होईल.

गॅलेक्सी टॅब ए 2017च्या वापरकर्त्यांना 1 वर्षासाठीचा 180 जीबी 4जी डेटा प्राप्त होईल, तेही रिलायन्स जिओच्या सौजन्याने. ग्राहकांनी 10 ऑक्टोबर ते 9 नोव्हेंबर 2017मध्ये गॅलेक्सी टॅब ए 2017 खरेदी केल्यास, या खरेदीबरोबर तुम्ही एक वेळच्या स्क्रीन रिप्लेसमेंट सेवेसाठी पात्र ठरता.

**<u>सॅमसंग इलेक्ट्रॉनिक्स को. लिमिटेडबद्दल थोडेसे</u>**

सॅमसंग इलेक्ट्रॉनिक्स को. लिमिटेड जगाला प्रोत्साहीत करते आणि रूपांतरणाच्या संकल्पना आणि तंत्रज्ञान यांच्या साहाय्याने भविष्याचा आकार घडवते. कंपनी टीव्ही, स्मार्टफोन, वेअरेबल उपकरणे, टॅबलेट, कॅमेरे, डिजिटल उपकरणे, वैद्यकीय साधने, नेटवर्क यंत्रणा आणि निमआयजोक आणि एलइडी उपाययोजना आदी गोष्टींच्या नवी व्याख्या जगापुढे आणत आहे. सॅमसंग इंडियाच्या ताज्या बातम्यांसाठी सॅमसंग इंडिया न्यूजरूमला http://news.samsung.com/in येथे भेट देऊ शकता.

हिंदीसाठी सॅमसंग न्यूजरूम भारतवर https://news.samsung.com/bharat येथे लॉग ऑन करा. याशिवाय तुम्ही आम्हाला ट्विटरवर @SamsungNewsIN येथे फॉलो करू शकता.

अधिक माहितीसाठी कृपया येथे संपर्क साधा :

वरुण सिन्हा
सॅमसंग इंडिया
इमेल : varun.sinha@samsung.com

दीपेंद्र छेत्री
अॅडफॅक्टर्स पीआर
इमेल :deependra.chetri@adfactorspr.com
फोन : +91 98104 18855